# -:महाराष्ट्र शासन:-

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. ०७२४-२४३१९६०, २४३७०७८ फॅक्स क्र.२४३७०७८

जा.क्र.शावैमअ/आस्था-१,२/क.नि/ ८०९४ /२०१७ दिनांक : ३१/०८/२०१७

# जाहीरात

विषय : कनिष्ठ निवासी अनोंदणीकृत बंधपत्रित ची पदे तात्पुरत्या स्वरुपात १८० दिवसांकरीता भरणेबाबत.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथील "कनिष्ठ निवासी" (अनोंदणीकृत बंधपत्रित) ची रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात १८० दिवसांकरीता भरण्यासाठी बंधपत्रीत अर्हताप्राप्त उमेदवारांकडून विहीत नमुन्यात अर्ज दि.०१.०९.२०१७ ते दि.०८.०९.२०१७ या कालावधीत मागविण्यात येत आहेत. अर्जाचा विहीत नमुना कार्यालयीन वेळेत कामाकाजाच्या दिवशी मिळेल. अर्ज करते वेळी उमेदवार शासकीय/ अशासकीय सेवेत कार्यरत असल्यास त्यांनी अर्ज विहीत मार्गाने सादर करावा.अन्यथा त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच विहीत नमुन्यातील अर्जाचाच मुलाखतीकरीता विचार करण्यात येईल. (यापूर्वी या कार्यालयास सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही).

नियम व अटी :

१)वेतन : नियमाप्रमाणे

२) कनिष्ठ निवासी अनोंदणीकृत (पी.जी रिक्त जागेवर) **१६ पदे**

३) शैक्षणीक अर्हता: एम.बी.बी.एस.उर्तीण, बंधपत्रित उमेदवार,अंतरवासियता पूर्ण व कायम नोंदणी क्र.आवश्यक

४) बंधपत्रीत उमेदवारांनाच प्राधान्य देण्यांत येईल.

५) नियमानुसार उपलब्ध उमेदवारामधुन निवड करण्यांत येईल.

६) वयोमर्यादा - अर्ज स्विकारण्याचे अंतिम दिनांकास ३३ वर्षेपर्यंत (मागास-वर्गीयाचे बाबतीत ५ वर्षे शिथिलक्षम.)

अपूर्ण अर्ज अथवा साक्षांकीत केलेले प्रमाणपत्र जोडलेले नसल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराला मुलाखतीसाठी स्वखर्चाने हजर राहावे लागेल व मूळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. मुलाखत ही अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला यांच्या कार्यालयात राहील. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही.

**१) मुलाखतीची तारीख १३.०९.२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता.**

गुणवत्ता यादी ही एमबीबीएस परीक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल. **या वैद्यकीय महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला प्रथम प्राधान्य देण्यात येईल.**

कृ.मा.प.

—२—

वरील जाहीरातीमधील पदाच्या संख्येत कमी अधिक करण्याचा तसेच निवड समितीमार्फत निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबित ठेवण्याचे अथवा नियुक्ती रद्द करण्याचे अथवा सदर जाहीरात रद्द करण्याचे सर्व अधिकार संस्थाप्रमुखांनी राखुन ठेवले आहेत.

अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या छायाप्रती साक्षांकीत करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतीही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

१) प्रथम, व्दितीय व तृतीय वर्ष एमबीबीएस.गुणपत्रिका २) पदवी प्रमाणपत्र ३) प्रयत्नाचे प्रमाणपत्र ४) जन्मतारखेचे प्रमाणपत्र ५) जातीचे प्रमाणपत्र ६) जाती वैधता प्रमाणपत्र ७) अनुभवाचे प्रमाणपत्र ८) एम.एम.सी.नोंदणी प्रमाणपत्र ९) बंधपत्रित उमेदवार असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडुन, बंधपत्रित कालावधी कधी सुरु झाला पैकी किती कालावधी पूर्ण केला याबाबत योग्य ते पुराव्याचे कागदपत्र जोडणे उमेदवारास बंधनकारक आहे.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अकोला

प्रत-

१) सूचना फलक
२) सर्व प्राध्यापक व विभागप्रमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला यांना माहितीकरीता
३) ग्रंथपाल, ग्रंथालय सूचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला.
४) सर्व अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपुर/चंद्रपुर/गोंदिया/यवतताळ/नांदेड/लातुर/कोल्हापुर/ सोलापुर/मिरज/सांगली/औरंगाबाद/धुळे/मुंबई
६) आय.एम.ए.हॉल.अकोला.

प्रत माहितीस्तव सादर -

१) मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-१.